# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक २५/११/२०२२ (शुक्रवार) दुपार

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील माथनी दिनांक २४/११/२०२२ चे ०५.३० वा. दरम्यान यातील ट्रक क्र एम. एच.– ४०/सी.एम.– १२९५ चा चालक आरोपी व मृतक नामे–शुभम रामभुवन मिश्रा, वय २३ वर्ष, रा. खरबी नागपुर याने आपले वाहन भरधान वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहन क्र १८ चक्का ट्रेलर क्र. सी. जी. –०४/एल.जी.–९१५५ या वाहनाला जोरदार धडक मारली. त्या अपघातामध्ये ट्रक मधील चालकाचे स्वत:चे मरणास व सोबत असलेला विनोद कुमार मिश्रा, वय ३४ वर्ष, रा. घरसंसार नगर, कापसी खुर्द नागपूर याचे सुद्धा मरणास तसेच कंडक्टर जखमी नामे– नागेंद्र श्रीरामकरन कुशवाह, वय २३ वर्ष, रा. सिपुरवा, ता. गुड, जि. रिवा, म. प्र. याला जखमी करण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक जगदीश बिरोले, पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी ट्रक चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (ए) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी पोलिस स्टेशन मौदा मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर